श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

दिनांक : २१/०८/२०२५

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय: भाद्रपद गणेशोत्सव २०२५ कालावधीतील दि. २९/०८/२०२५ रोजी आयोजित अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाकरीता साऊंड सिस्टीम भाडेतत्वावर घेण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्यासाठी.

भाद्रपद गणेशोत्सव कालावधीतील अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाकरीता साऊंड सिस्टीम भाडेतत्वावर घेण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रके मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती –**

१) सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रके दोन लिफाफ्यात सादर करावीत. एका लिफाफ्यात (Technical Bid) यामध्ये मोबाईल क्रमांक, कंपनीची माहिती, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/ट्रेडींग लायसन्स/उद्यम प्रमाणपत्र/ गुमास्ता प्रमाणपत्र, कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र, उलाढाल,जीएसटी प्रमाणपत्राची प्रत, पॅन कार्डची प्रत इ खालील नमूद केल्याप्रमाणे, दुसऱ्या लिफाफ्यात (Financial Bid) मूल्य दरपत्रक याप्रमाणे दोन वेगवेगळया लखोटयामध्ये भरुन लाखेने सिलबंद करुन सदर लिफाफे दि. २३/०८/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत मंदिर प्रतिक्षालय इमारत तळमजला येथील आवक–जावक नोंदणी विभागामध्ये सादर करावी.

२) आपल्या क्षेत्रात करीत असलेल्या कामाचा ३ वर्षाचा अनुभव असल्याबाबतची प्रमाणपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर करावी. आपण करीत असलेल्या कामाचा दर्जा उत्तम प्रकारचा असावा.

३) दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २०–२५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन आपातकालीन परिस्थितीत त्वरीत उपस्थित राहणे शक्य होईल.

४) मागील ३ वर्षाची आर्थिक उलाढाल कमीत कमी ५ लक्ष असावी. याबाबत सनदी लेखापाल (सीए) यांचे प्रमाणपत्र आवश्यक.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

५) दरपत्रक भरताना सर्व प्रकारचे कर मिळून एकत्रित रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकातच दर भरुन देणे आवश्यक आहे. न्यास दरपत्रकात दर भरुन न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल.

६) न्यासाने नेमून दिलेली कामे विहित वेळेत न केल्यास वा काम न्यासाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार न आढळल्यास, कामात दिरंगाई होत असेल, अथवा कामात असमाधानकारक परिस्थिती आढळून आल्यास किंवा कोणताही वाद निर्माण झाल्यास दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार न्यासास असेल.

७) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

८) दरपत्रकधारकाने GST क्रमांक व PAN कार्ड दरपत्रकांत नमूद करावा. (सोबत प्रत जोडावी.)

९) दरपत्रकधारकाने GST क्रमांक लागू नसल्यास, कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून न्यास दरपत्रकासोबत सादर करावे.

१०) माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११ वर न्यासाचे देखभाल व दुरुस्ती विभागयांच्याशी संपर्क साधावा.

११) दि. २३/०८/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

Vpati)
( कार्यकारी अधिकारी )

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

# दरपत्रकाचा तपशील

विषय : भाद्रपद गणेशोत्सव २०२५ कालावधीतील दि. २९/०८/२०२५ रोजी आयोजित अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमासाठी साऊंड सिस्टीम भाडेतत्वावर घेण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्यासाठी.

नाव:-----------------------------------------------------------------

पत्ता:-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

कंपनी नोंदणी क्रमांक : ........................................ जीएसटी क्रमांक : ........................................

पॅन कार्ड क्रमांक : ........................................

| Sr. No. | Description | Rates (All Taxes included) |
|---|---|---|
| 1 | Vrx speakers 4 nos. | |
| 2 | Bass 2 nos | |
| 3 | Top speakers 4 nos | |
| 4 | Monitors 4 nos | |
| 5 | Mixing console | |
| 6 | Boom mic stand | |
| 7 | Cordless Mic 2 nos | |
| 8 | Cordless Mic 6 nos | |
| 9 | Side feel speakers 2 nos | |
| 10 | Laptop 1 nos | |
| | Total Amount (All Taxes included) | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का